22 NOV 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ अधिसभा निवडणूक विकास आघाडीची बाजी

## तब्बल २४ तासांनी मतमोजणी पूर्ण

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठ निवडणुकीमध्ये अभ्यास मंडळे, नोंदणीकृत पदवीधर, प्राचार्य गट, संस्थाचालक आणि विद्यापीठ शिक्षक गटासाठी झालेल्या निवडणुकीमध्ये शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीने बाजी मारली, तर सहा अभ्यास मंडळे, तीन महाविद्यालयीन शिक्षक आणि विद्या परिषदेवर सुटाने आपले वर्चस्व अबाधित ठेवले. सोमवारी सकाळी ८ वाजता सुरू झालेली मतमोजणी प्रक्रिया मंगळवारी सकाळी ८ वाजून ५ मिनिटांनी पूर्ण झाली.

यंदाच्या निवडणुकीत स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था आणि रयत या दोन मोठ्या संस्था आघाडीत सहभागी झाल्याचा लाभ विकास आघाडीस झाला. ऐन निवडणुकीत उफाळून आलेल्या वादाचा फटका सुटाला बसला. विद्यापीठ विकास आघाडीने यापूर्वीच संस्थाचालक प्रतिनिधी गट आणि प्राचार्य गटावर बाजी मारली होती, तर आता त्यांनी नोंदणीकृत पदवीधर गटावरही आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

संपूर्ण रात्रभर विद्यापीठाचे अधिकारी आणि कर्मचारी मतमोजणी प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी काम करत होते. कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर आणि उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे यांनी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्याबरोबरच स्वतःही मतमोजणी आणि वर्गीकरणाचे काम करत होते. पहाटे ५ वाजल्यानंतर नोंदणीकृत पदवीधर संघाचा निकाल जाहीर झाला. यावेळी उमेदवारांसह त्यांच्या समर्थकांनी घोषणाबाजी करत जल्लोष केला, तर महाविद्यालयीन शिक्षक आणि विद्या परिषदेवर विजय मिळविल्यानंतर सुटाच्या सदस्यांनी जल्लोष करत एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

**नोंदणीकृत पदवीधर गटातील विजयी उमेदवार आणि कंसात त्यांना मिळालेली मते :** सर्व जागा विद्यापीठ विकास आघाडीकडे : संजय जाधव - (१२७४), स्वाती पंडित - (५२२५), दिनेश जंगम - (४८७९) अमरसिंह रजपूत - (५०६३) मधुकर पाटील - (११२४) पंकज मेहता - (९९३) मल्लाप्पा चौगुले - (१०६३) श्रीनिवास गायकवाड - (१००२). आरती शिंदे - (५१३८)

महाविद्यालयीन शिक्षक संघ विद्यापीठ विकास आघाडी : सतीश घाटगे - (५१५), वसंत पाटील - (४४५)

सुटा : अरुण पाटील - (५५६), आर. आर. थोरात - (१३६६), अलका निकम - (१७०७), मनोज गुजर - (४९४), ईला जोगी - (१६९७), एन. के. खंदारे - (१४६८), प्रकाश कुंभार - बिनविरोध.

विद्या परिषद शिक्षक सायन्स टेक्नॉलॉजी विद्या शाखा : डॉ. डी. एच. दगडे - (१९२७), पी. एन. वासंबेकर - (१८९२)

वाणिज्य विद्या शाखा आर. जी. कोरबू - (१८०४), आय. डी. एस. विद्या शाखा, प्रतिभा पाटणकर - (१८६६).


अमरसिंह रजपूत


दिनेश जंगम


अरुण पाटील


डी. एच. दगडे


आर. जी. कोरबू


एन. ए. खंदारे


आर. आर. थोरात


पी. एन.वासंबेकर



एम. डी. गुजर


मधुकर पाटील


मल्लाप्पा चौगुले


पंकज मेहता


प्रकाश कुंभार


संजय जाधव


सतीश घाटगे


श्रीनिवास गायकवाड


वसंत पाटील


स्वाती पंडित


आरती शिंदे


प्रतिभा पाटणकर


अलका निकम


ईला जोगी

### सर्वांच्या सहकार्यामुळे निवडणूक सुरळीत

निवडणूक प्रक्रियेबाबत बोलताना कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी व्ही. डी. नांदवडेकर म्हणाले, सुरुवातीपासूनच सर्वच घटकांनी निवडणूक सुरळीत पार पडावी यासाठी कष्ट घेतले होते. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया पारदर्शी आणि सुरळीतपणे पार पडली. पुढील निवडणुकांतही या अनुभवावरून निवडणूक सुरळीत पार पाडण्यात येतील.

### मोठ्या संख्येने मते बाद

अभ्यास मंडळाप्रमाणेच शिक्षक गटामध्ये १८६, तर नोंदणीकृत पदवीधर गटामध्ये ६६९ मते बाद झाली. काही मतदारांनी मतपत्रिकांतून आपल्या भावनाही मांडल्या होत्या. पदवीधर गटातील एका मतपत्रिकेवर 'विजयी उमेदवारांनी विद्यापीठाच्या विकासाकडे लक्ष देण्याचे आवाहन केले होते.

22 NOV 2017

तरुण भारत

# विद्या परिषदेवर 'सुटा', पदवीधरमध्ये 'आघाडी

## अधिकार मंडळ निवडणूक : एकूण निकालात 'विद्यापीठ विकास आघाडी'चाच वरचष्मा, तब्बल २४ तास मतमोजणी : विजयान

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यापीठ निवडणूकीच्या निकालामध्ये अभ्यास मंडळे, नोंदणीकृत पदवीधर, प्राचार्य, संस्थाचालक व विद्यापीठ शिक्षक गटासाठी झालेल्या निवडणुकीमध्यें 'विद्यापीठ विकास आघाडी'ने बाजी मारली. तर सहा अभ्यास मंडळे, तीन महाविद्यालयीन शिक्षक आणि विद्यापरिषदेवर सुटाने आपले वर्चस्व कायम ठेवले. यामध्ये आजी माजी विद्यार्थी संघटनेला एकही जागा मिळवता आली नाही. सोमवारी सकाळी ९ वाजता सुरू झालेली मतमोजणीची प्रक्रिया मंगळवारी सकाळी साडेआठ वाजता संपली. तब्बल २४ तासांनी मतमोजणीचे काम पूर्ण झाले.

विद्यापीठ निवडणूकीत मतमोजणीच्या पहिल्या दिवशी पहाटेपर्यंत अभ्यास मंडळ, संस्थाचालक, प्राचार्य, आणि नोंदणी पदवीधरमध्ये विद्यापीठ विकास आघाडी आघाडीवर होती. यापूर्वी सर्वच अभ्यास मंडळांसह विद्यापरिषद आणि महाविद्यालयीन शिक्षक गटामध्ये सुटाचे वर्चस्व होते. यावर्षी रयत शिक्षण संस्था आणि विवेकानंद शिक्षण संस्था या व्रिद्यापीठ विकास आघाडीमध्ये समाविष्ट झाल्या होत्या. त्यामुळे महाविद्यालयीन शिक्षक गटामध्ये २ जागा विद्यापीठ विकास आघाडीला मिळाल्या. एका अर्थाने सुटाच्या वर्चस्वाला हादरा बसला असल्याचे बोलले जात आहे. विद्यापीठ विकास आघाडीने अभ्यास मंडळ, संस्थाचालक, प्राचार्य, आणि नोंदणी पदवीधरमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित केल्याने शिक्षण क्षेत्रात त्यांचे स्वागत होते.

पदवीधर मतदारसंघाचा निकाल पहाटे सव्वापाच वाजता जाहीर झाला. याप्रसंगी पदवीधरमधील उमेदवारांसह कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. तर आघाडीच्या नेत्यांनी विद्यापीठात येऊन सर्व उमेदवारांचे स्वागत केले. तसेच शिक्षक मतदारसंघ व विद्यापरिषदेवर विजय मिळवल्यानंतर सुटाच्या शिक्षकांनीही जल्लोष केला. सुटाच्या हक्काच्या विद्यापरिषदेवर एकहाती विजय प्रस्थापित केल्याने विद्यापीठ परिक्षेत्रातून सुटाच्या कार्यकर्त्यांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. रात्रभर विद्यापीठ पदाधिकारी, कर्मचारी मतमोजणीचे काम करीत होते. तर सर्वच संघटनांचे नेते परीक्षा भवनच्या



**कोल्हापूर : पदवीधर मतदारसंघातून डॉ. संजय जाधव यांच्या विजयाची घोषणा झाल्यानंतर मंगळवारी पहाटे पाच वाजता विद्यापीठ विकास आघाडीचे डॉ. संजय डी. पाटील यांना समर्थकांनी गुलाल लावून आनंद साजरा केला. याप्रसंगी डॉ. प्रताप पाटील, महादेव नरके, विनोद पंडित आदी.**

आवारात बसून होते. पदवीधर मतदारसंघातील मधुकर पाटील यांना कमी मते मिळाल्याने त्यांनी आपल्याच संघटनेतील कार्यकर्त्यांशी वाद घातल्याची चर्चा आहे.

**नोंदणीकृत पदवीधर**

सर्व जागा विद्यापीठ विकास आघाडी : संजय

22 NOV 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आघाडी-मंचचे डावपेचच यशाचा परिपाक

## चार संघटनांची एकी फळाला : मंत्री पाटील, संजय पाटील यांच्या हाती विद्यापीठ राजकारणाची सूत्रे

**संदीप खांडेकर :** सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी व शिवाजी विद्यापीठ विकास मंचने बांधलेली एकीची मोट फळास आली. २६ पैकी १७ अभ्यास मंडळांवर मिळविलेले वर्चस्व व थेट महाविद्यालयीन शिक्षक गटातील दोन जागांवर मारलेली मुसंडी हा विकास आघाडी व विकास मंचने रचलेल्या डावपेचांच्या यशाचा परिपाक आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) विद्यापीठ वर्तुळातील चार संघटनांच्या साथीने मारलेली मजल भविष्यातील विद्यापीठाच्या राजकारणाचे चित्र स्पष्ट करणारी आहे. पालकमंत्री चंद्रकांत पाटील, विकास आघाडीचे संजय डी. पाटील व ऋतुराज पाटील यांच्या हातात विद्यापीठाच्या राजकारणाची सूत्रे एकवटली आहेत.

महाराष्ट्र पब्लिक युनिव्हर्सिटी ॲक्टच्या अंमलबजावणीनंतर झालेली ही निवडणूक वैशिष्ट्यपूर्ण ठरली. त्याचे प्रमुख कारण विद्यापीठ वर्तुळातील पाच संघटनांचे झालेले एकत्रीकरण. डॉ. राहुल माने व मिलिंद भोसले यांच्या सुमारे साडेतीन वर्षांच्या अथक परिश्रमाने शिवाजी विद्यापीठ सेवक संघ, अभाविप, कास्ट्राईब, महाराष्ट्र राज्य आंतरमहाविद्यालयीन शिक्षकेतर संघटना शिवाजी विद्यापीठ विकास मंचच्या झेंड्याखाली एक झाल्या. विद्यापीठ कक्षेत फारसे यश हाताला लागत नसल्याची सल अभाविपच्या पदाधिकाऱ्यांत होती. ती यानिमित्ताने दूर झाली आणि अभाविपला अन्य संघटनांच्या छत्रछायेखाली अस्तित्व टिकविण्याची संधी चालून आली.

राज्यातील भाजपची सत्ता, या पक्षाचे पालकमंत्री पाटील व भाजपचीच शाखा म्हणून ओळखली जाणारी अभाविप यामुळे पालकमंत्री या घडामोडीत केंद्रस्थानी येणार हे गृहीत होतेच. त्याचा फायदा उठविण्याची शक्कल शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीने लढवली. विकास आघाडी व विकास मंचने हातमिळवणी केली आणि 'सुटा'ला धडा शिकविण्यासाठी त्यांनी फासे टाकण्यास सुरुवात केली.

### 'सुटा' पदाधिकाऱ्यांवर आत्मपरीक्षणाची वेळ

**'सुटा'ने विद्या परिषद व महाविद्यालयीन शिक्षक गटावर आपले वर्चस्व मिळवले. मात्र, महाविद्यालयीन शिक्षक गटात विकास आघाडीने दोन जागांवर विजय मिळवल्याने ही 'सुटा'ची पीछेहाट आहे. अभ्यास मंडळावरही 'सुटा'ला दणका बसला. विशेष म्हणजे त्यांचे बंडखोर उमेदवार डॉ. ढमकले यांनी तब्बल ६५३ मते मिळवून 'सुटा'ला धक्का दिला. त्यामुळे सुटाच्या पदाधिकाऱ्यांवर आत्मपरीक्षणाची वेळ येऊन ठेपली आहे.**



'सुटा'ला एकट्याने निवडणुकीचा किल्ला लढवावा लागणार हे उघड होते. रयत शिक्षण संस्था व स्वामी विवेकानंद संस्थेशी काडीमोड झाल्याने 'सुटा'ला प्रचारात कमी पडून चालणार नव्हते; पण 'सुटा'समोर मुख्य पेच होता तो उमेदवारी देण्याचा. नेमक्या याच प्रकरणाने 'सुटा'तील वातावरण इतके गढूळ झाले, की 'सुटा'चे कट्टर सदस्य प्रा. आर. डी. ढमकले यांनी सुटाला सोडचिठ्ठी देत बंडखोरीचे निशाण फडकवले. 'सुटा'च्या पदाधिकाऱ्यांच्या जवळच्यांना उमेदवारी देण्याचा आरोप या निमित्ताने चर्चेला आला. या अस्वस्थतेचा फायदा उठविण्यासाठी विकास आघाडीने थेट रयत व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेशी मोट बांधली.

तसेच माजी आमदार विनय कोरे यांच्याकडील अभियांत्रिकी प्राध्यापकांच्या मतांचा गठ्ठा ओळखून त्यांच्याकडे मैत्रीचा हात पुढे केल्याचे सांगण्यात येते. विकास मंचने या स्थितीचा लाभ उठवत विकास आघाडीपुढे अधिकार मंडळांच्या जागा वाटपात आपल्याला जागा मागून घेतल्या. विशेष म्हणजे विकास मंचचे विद्यापीठ शिक्षक गटातील उमेदवार प्रा. डॉ. एन. बी. गायकवाड यांच्या अंगाला गुलालही लागला.

अभाविपने सावध पवित्रा टाकत चाली रचल्या. व्यवस्थापन परिषदेवर अमित कुलकर्णी व डॉ. विवेक खंजोडे यांची राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून वर्णी लागली. बीसीयूडीचे माजी संचालक व प्राचार्यांच्या गटाचे नेतृत्व करणारे डॉ. डी. आर. मोरे यांचे व्यवस्थापन परिषदेवर राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून नाव चर्चेत होते. त्यांची नियुक्ती झाली असती, तर त्यांना विकास आघाडीकडून विद्यापीठ वर्तुळात बॅटिंग करण्यास कोणतीच अडचण नव्हती. त्यामुळे प्राचार्य गटाची सूत्रे आता प्रा. डॉ. क्रांतिकुमार पाटील यांना हलवावी लागतील आणि त्यांना निश्चितच डॉ. मोरे सहकार्य करतील.

22 NOV 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विकास आघाडीच्या व्यूहरचनेमुळे 'सुटा'ची पीछेहाट

**कोल्हापूर : विजय पाटील**

शिवाजी विद्यापीठ सिनेट निवडणूक प्रचंड चुरशीने आणि इर्ष्येने झाली. विकास आघाडीच्या नेत्यांनी सुरुवातीपासून सकारात्मक आणि संघटित भूमिका घेतल्याने त्यांचा विजय निर्विवाद दिसला. तर 'सुटा'त तिकीट वाटपासून बंडखोरीचे झेंडे फडकले. त्यामुळे संघटनेत अस्वस्थता निर्माण झाली. असे असतानाही विद्या परिषदेवर 'सुटा'ने एकहाती वर्चस्व राखले. मात्र, हक्काच्या समजल्या जाणाऱ्या शिक्षक गटातील दोन जागा गमावल्या. अभ्यासमंडळांच्या 'सुटा'च्या वर्चस्वाच्या गडालाही आघाडीने भगदाड पाडले. त्यामुळे 'सुटा'ची या निवडणुकीत पीछेहाट झाल्याचे स्पष्ट आहे. याउलट आघाडीचे व्यापक नियोजन असतानाही विद्या परिषदेची एकही जागा त्यांना जिंकता आली नाही, ही खंत त्यांना पुढील काळात जाणवणार आहे.



शिवाजी विद्यापीठ
सिनेट निवडणुक

पंधरा-वीस वर्षांपूर्वी शिवाजी विद्यापीठात 'सुटा बोले आणि विद्यापीठ चाले' अशी परिस्थिती होती. कारण 'सुटा'चे सिनेटसह सर्वच अधिकार मंडळांवर एकहाती वर्चस्व होते. मात्र, दहा वर्षांपासून सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे संस्थाचालक आणि प्राचार्यांच्या एकजुटीने 'सुटा'च्या या मक्तेदारीला खिंडार पाडण्यास सुरुवात झाली. गत निवडणुकीत शिक्षक गट, विद्या परिषद आणि अभ्यास मंडळांसाठी विकास आघाडीला उमेदवार शोधावे लागले होते. इतका दबदबा शैक्षणिक गटांमध्ये 'सुटा'चा होता. पण या निवडणुकीत चित्र पूर्ण पालटले. नव्या कायद्याचा अंदाज घेत विकास आघाडीचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील व भैया माने, प्राचार्य डी. आर. मोरे यांनी सुरुवातीपासून सकारात्मक भूमिका घेतली. आघाडीच्या झेंड्याखाली त्यांनी विकास मंच, अभाविप, सेवक संघ, सुफ्टा अशा संघटनांना सामावून घेतले. 'सुटा'च्या भक्कम पाठीशी असणाऱ्या विवेकानंद आणि रयतसारख्या बड्या शिक्षण संस्थांना त्यांनी आघाडीच्या तंबूत आणण्यात यश मिळवले. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना आघाडीचे मार्गदर्शक बनवून 'सुटा' वगळता सर्वांनाच एकत्रित केले. ही गोष्ट आघाडीच्या निर्विवाद यशाची नांदी ठरली. यासह जागा वाटप करताना सर्वच घटकांचा विचार करत प्रसंगी सबुरीची भूमिका घेत वाद टाळला. याचा परिणाम पदवीधर, प्राचार्य, संस्था प्रतिनिधी, विद्यापीठ शिक्षक या गटांतील यश कायम राखतानाच अभ्यास मंडळावरील 'सुटा'चे वर्चस्व मोडीत काढले. तर शिक्षक गटातही दोन जागा जिंकून 'सुटा'च्या बालेकिल्ल्यात आक्रमण केले.

'सुटा'चे नेतृत्व इतर समविचारी संस्थांशी संघटन करण्यात मागे पडले. त्यांना कोल्हापूर 'सुटा'चे जिल्हाध्यक्ष असणाऱ्या प्रा. रघुनाथ ढमकले यांची बंडखोरीही रोखता आली नाही. उलट त्यांनी प्रा. ढमकले यांचे पदावरून निलंबन करून संघटनेत फुटीची बीजे रोवली. निलंबनाचा फायदा उठवून प्रा. ढमकले यांनी 'सुटा'च्या ज्येष्ठ नेत्यांच्या मनमानी विरोधात आवाज उठवत अँग्री यंग मॅन स्टाईल प्रचार केला. संघटनेला याचा फटका निश्चित बसला. तरीही आघाडीच्या दिग्गजांचा झंझावात आणि प्रचंड मोठी यंत्रणा असतानाही 'सुटा'ने विद्या परिषद राखली. तसेच शिक्षक गटातही आठ जागा राखल्या. हे यश प्राध्यापकांच्या हक्कांसाठी आवाज उठवणाऱ्या 'सुटा'च्या मजबूत संघटनात्मक बांधणीचे मानता येईल. आघाडीला यश मिळाले असले तरी आता शैक्षणिक आव्हानांचे संधीत रूपांतर करून त्यांना ते यशस्वी धोरणे राबवून भविष्यात सिद्ध करावे लागेल तर 'सुटा'च्या नेतृत्वालाही गमवाव्या लागणाऱ्या जागांबाबत चिंतन करावे लागेल.

## 'अभाविप'ची एन्ट्री

*या निवडणुकीत अभाविप या संघटनेने दमदार एन्ट्री केली. पदवीधर गटात चार जागा 'अभाविप'ने आघाडीच्या झेंड्याखाली सिनेटमध्ये पाठवल्या. विद्यापीठ शिक्षक गटांतही एक जागा त्यांनी जिंकली. याउलट निवडणुकीपूर्वी मोठे आव्हान निर्माण केलेल्या विद्यार्थी कृती समितीने नेटाने झुंज दिली असली तरी पदवीधरमध्ये त्यांना अपेक्षित मते मिळाली नाहीत.*

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स

# विकास आघाडीचेच विद्यापीठात वर्चस्व

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ विविध अभ्यास मंडळ व अधिसभा (सिनेट) निवडणुकीत नोंदणीकृत पदवीधर, प्राचार्य व संस्था गटाच्या सर्व जागा तर विद्यापीठ शिक्षक गटातील तीन आणि महाविद्यालयीन शिक्षक गटातील दोन जागा जिंकत सिनेटवर विकास आघाडीने एकहाती सरशी केली. पाच विविध संस्थांची युती करत एकत्र आलेल्या विकास आघाडीचे आव्हान पेलणाऱ्या शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाने (सुटा) या निवडणुकीत सवतासुभा मांडत प्रतिष्ठेच्या विद्या परिषदेच्या सहाही जागांवर विजय मिळवत दबदबा कायम ठेवला. मात्र आजवर हक्काच्या समजल्या जाणाऱ्या कॉलेज शिक्षक गटात दहापैकी आठ जागा जिंकल्या असल्या तरी दोन जागांवर त्यांना पराभव पत्करावा लागला. आजी माजी विद्यार्थी कृती समितीला मात्र आपले खाते उघडता आले नाही. गेल्या निवडणुकीत अवघ्या तीन जागांवर समाधान मानणाऱ्या आघाडीच्या हाती आलेली सिनेटची सत्ता, निवडणुकीच्या ऐन तोंडावर अंतर्गत कलहामुळे पडलेल्या फुटीचा 'सुटा'ला बसलेला दणका या दोन गोष्टी यंदाच्या निवडणुकीत चर्चेच्या ठरल्या. दरम्यान, एकूण सिनेटमधील ३८ जागांपैकी विकास आघाडीने ३० इतक्या जागांवर बाजी मारली असून शिक्षक गटातील ८ जागांवर 'सुटा'ला समाधान मानावे लागले.

**सिनेटमधील ३८ पैकी ३० जागा आघाडीकडे**

विद्या परिषदेच्या सहाही जागांसाठी सुटा आणि आघाडी यांनी निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. विद्यापीठाच्या कारभारात सिनेटबरोबरच विद्यापरिषदेत होणाऱ्या निर्णयांना असलेले महत्त्व लक्षात घेउन विद्या परिषदेवर कुणाचा विजय होणार याकडे लक्ष लागले होते. या गटातील एकूण आठ जागांपैकी दोन जागा रिक्त होत्या. उर्वरित सहा जागांवर सुटाने निर्विवाद वर्चस्व मिळवत आघाडीचा एकहाती पराभव केला.

>> संबंधित वृत्त...२

22 NOV 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'पदवीधर'मध्ये एकतर्फी आघाडी; विद्या परिषद 'सुटा'ने राखली

- महाविद्यालयीन शिक्षकमध्ये 'सुटा'ला खिंडार
- दोन जागा मिळवून आघाडीचा शिरकाव
- दुसऱ्या दिवशी आठ वाजेपर्यंत मतमोजणी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ निवडणुकीत वर्चस्व स्पष्ट झाल्यानंतर मंगळवारी पहाटे आनंद व्यक्त करताना विकास आघाडीचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील व समवेत विजयी उमेदवार.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीत सर्वाधिक लक्षवेधी असलेल्या पदवीधर गटातील सर्वच नऊ जागांवर विकास आघाडीने एकतर्फी वर्चस्व राखले. तर शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाने (सुटा) विद्या परिषदेच्या पाचही जागांवर निर्विवाद विजय मिळवत राखल्या. 'सुटा'चा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या महाविद्यालयीन शिक्षक गटात आघाडीने दोन जागा मिळवून खिंडार पाडले. एकूणच विद्या परिषद व शिक्षक गट वगळता सर्वच विभागांत विकास आघाडीचे वर्चस्व मिळवले. विजयी उमेदवारांनी मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंत निकाल जाहीर होत जाईल तसा जल्लोष केला.

**नोंदणीकृत पदवीधर गटांतील विजयी उमेदवार व कंसात त्यांची मते :**

खुला प्रवर्ग : संजय पांडुरंग जाधव (सर्वाधिक मते १२७४), मल्लाप्पा लगमान्ना चौगुले (१०६३), श्रीनिवास बाळासाहेब गायकवाड (१००९), पंकज पदमचंद मेहता (११६१), मधुकर मुकुंद पाटील (११२४), महिला : आरती प्रभाकर शिंदे, स्वाती विनोद पंडित (५२२५), डीटीएनटी : अमरसिंग चंदरसिंग रजपूत (५०६३), ओबीसी : दिनेश गंगाधर जंगम (४८७९) आदी. विजयी सर्व उमेदवार हे विकास आघाडीचे आहेत. यापूर्वीच आघाडीचे एक लोभाजी भिसे उमेदवार बिनविरोध निवडून आले.

**महाविद्यालयीन शिक्षक :**

खुला प्रवर्ग - डॉ. प्रा. अरुण पाटील (५५६), प्रा. ए. बी. पाटील (५२२), डॉ. एम. डी. गुजर (४९४ सर्व सुटा), सतीश रामचंद्र घाटगे (५१५), वसंत मारुती पाटील (४४५ दोघे आघाडी) एसटी प्रवर्ग- डॉ. अलका निकम (१७०७), डीटीएनटी - डॉ. आर. आर. थोरात (१३६६),

पान २ वर »

22 NOV 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवीधरमध्ये एकतर्फी आघाडी : विद्या परिषद सुटाने राखली

(पान १ वरून)

एससी- डॉ. एन. के. खंदारे (१४६८), महिला- डॉ. इला जोगी (१६९७ सर्व सुटा), आदी. सुटाचे डॉ. प्रकाश कुंभार यापूर्वीच निवडून आले आहेत.

विद्या परिषद (अॅकॅडेमिक कौन्सिल)- सायन्स व टेक्नॉलॉजी विद्याशाखा : डॉ. डी. एच. दगडे (१९२७), डॉ. पी. एन. वासंबेकर (१८९२) वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा : डॉ. आर. जी. कोरबू (१८०४), मानव्यशास्त्र विद्याशाखा : डॉ. सुनील सावंत (१७०५) आयडीएस विद्याशाखा- डॉ. प्रतिभा पाटणकर (१८६६) आदी. यापूर्वी डॉ. शर्मिला साबळे या बिनविरोध निवडून आल्या आहेत. निवडून आलेल्या सर्व जागा सुटाने राखल्या आहेत.

**आघाडी व सुटाचे बलाबल**

**अधिसभा (सिनेट)–**

**प्राचार्य :** सर्व ९ जागांवर विकास आघाडीचे उमेदवार

**संस्था गट :** सर्व ६ जागा विकास आघाडीकडे

**विद्यापीठ शिक्षक :** सर्व ३ जागा विकास आघाडीकडे

**नोंदणीकृत पदवीधर :** सर्व १० जागा विकास आघाडीकडे

**महाविद्यालयीन शिक्षक :** ८ जागांवर सुटा तर दोन जागा विकास आघाडी

**विद्या परिषद (अॅकॅडेमिक कौन्सिल)** – सर्व सहा जागा सुटाकडे

**अभ्यास मंडळे** – एकूण ४७ अभ्यास मंडळे. मात्र अनेक अभ्यास मंडळांना मतदार नोंदणी नाही. त्यामुळे ३३ अभ्यास मंडळांचा समावेश. यातील ८ मंडळांत कोणीही उमेदवारी दाखल केली नाही. उरलेल्या २५ मंडळांपैकी ११ मंडळे बिनविरोध झाली. त्यामुळे १५ मंडळांची निवडणूक लागली.

**नोंदणीकृत पदवीधर गटातील विकास आघाडीचे विजयी उमेदवार**



मल्लाप्पा चौगले संजय जाधव दिनेश जंगम पंकज मेहता



मधुकर पाटील अमरसिंह रजपूत श्रीनिवास गायकवाड आरती शिंदे स्वाती पंडित

**विद्या परिषद शाखेतील सुटाचे विजयी उमेदवार**



डी. एच. दडगे प्रतिभा पाटणकर सुनिल सावंत



आर. जी. कोरबु शर्मिला साबळे पी. एन. वसंबेकर

> माझा लढा हा सुटामध्ये सुरू असलेल्या सेवानिवृत्त एकाधिकारशाही प्रवृत्तीविरोधात आहे. या मंडळींकडून संघटना वेठीस धरण्यात आली आहे. सुटामध्ये लोकशाही नाही. सुटात लोकशाही निर्माण होण्यासाठी यापुढेही प्राध्यापकांना जागृत करण्यासाठी लढाई सुरूच राहील.
>
> **– प्रा. रघुनाथ ढमकले**

> निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि सुरक्षित पार पडली. सुरुवातीपासून प्रशासनाने योग्य नियोजन केल्याने ही प्रक्रिया पार पडली. यापुढे अधिकार मंडळे आणि प्रशासन यांच्यात समन्वय साधत कामकाज चालवले जाईल.
>
> **– डॉ. विलास नांदवडेकर, कुलसचिव**

### सुटाची एकाकी झुंज यशस्वी

सुटाच्या विरोधात दोन माजी मंत्री, एक आजी मंत्री, मोठ्या शिक्षण संस्था असे सगळे दिग्गज होते. या सर्व दिग्गजांनी मतदारांवर दबाव निर्माण करूनही सुटाची एकाकी झुंज यशस्वी झाली आहे. प्राध्यापकांचा सुटावर पूर्ण विश्वास असल्याचे सिद्ध झाले असल्याचे पत्रक सुटाने प्रसिद्धीस दिले आहे. आपला गैरकारभार उघड होऊ नये यासाठीच आघाडीकडून अधिकार मंडळाच्या निवडणुका लढवल्या जात असल्याचेही यामध्ये म्हटले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 NOV 2017
पुढारी

# सिनेटवर आघाडीचे, विद्या परिषदेवर 'सुटा'चे वर्चस्व

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा (सिनेट) व अधिकार मंडळाच्या निवडणुकीचे संपूर्ण निकाल मंगळवारी सकाळी आठ वाजता लागले. सिनेटवर विकास आघाडीने निर्विवाद वर्चस्व मिळवले. आघाडीने सतरा अभ्यास मंडळे जिंकत 'सुटा'चे यावरील वर्चस्व मोडीत काढले. 'सुटा'ने विद्या परिषदेवर मात्र एकहाती वर्चस्व मिळवले.

नव्या विद्यापीठ कायद्यानुसार शिवाजी विद्यापीठाची निवडणूक यंदा चांगलीच गाजली. शुक्रवारी (दि. १७) चुरशीने मतदान झाले. तर सोमवारी (दि. २०) सकाळी आठ वाजता सुरू झालेली मतमोजणी आज सकाळी आठ वाजता म्हणजे चोवीस तासांनंतर संपली. सिनेटच्या ३० जागा जिंकत आघाडीने पूर्ण बहुमत मिळवले. सिनेटमधील महाविद्यालयीन शिक्षक गटात 'सुटा'ने आठ जागा जिंकल्या असल्या, तरी दोन जागा मात्र गमावल्या. प्राचार्य, संस्था प्रतिनिधी, पदवीधर, विद्यापीठ शिक्षक आदी सिनेटच्या गटांत आघाडीचे एकहाती वर्चस्व आता राहणार आहे. २६ पैकी १७ अभ्यास मंडळांवर आघाडीने सत्ता काबीज केली. यामुळे अभ्यास मंडळांवरील 'सुटा'चे वर्चस्व आता संपुष्टात आले. त्यांच्याकडे सहा मंडळे आहेत. विद्या परिषदेच्या सर्व ६ जागा मात्र 'सुटा'ने राखल्या. यामध्ये आघाडीला एकही जागा मिळाली नाही.

विकास आघाडीच्या निर्विवाद विजयामुळे आघाडीच्या वतीने जोरदार जल्लोष करण्यात आला. शहरासह कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील विजयी उमेदवारांच्या समर्थकांनी संबंधित परिसरात डिजिटल फलक लावून शुभेच्छा दिल्याचे चित्र आहे. निवडणूक संपली, आता व्यवस्थापन परिषदेवर कुणाची वर्णी लागणार, याची चर्चा सुरू झाली आहे.

# विद्या परिषद 'सुटा'कडे

## सिनेट निवडणूक; आघाडीने मिळवले तीस जागांवर यश







### ९ महिला विजयी

### मतमोजणीला लागले चोवीस तास

# अभाविपचा विजयाचा षट्कार

Appasaheb.mali

Twitter: @Appasaheb_MT

# विद्यापीठ अधिसभा निवडणूक विकास आघाडीची बाजी

## तब्बल २४ तासांनी मतमोजणी पूर्ण

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठ निवडणुकीमध्ये अभ्यास मंडळे, नोंदणीकृत पदवीधर, प्राचार्य गट, संस्थाचालक आणि विद्यापीठ शिक्षक गटासाठी झालेल्या निवडणुकीमध्ये शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीने बाजी मारली, तर सहा अभ्यास मंडळे, तीन महाविद्यालयीन शिक्षक आणि विद्या परिषदेवर सुटाने आपले वर्चस्व अबाधित ठेवले. सोमवारी सकाळी ८ वाजता सुरू झालेली मतमोजणी प्रक्रिया मंगळवारी सकाळी ८ वाजून ५ मिनिटांनी पूर्ण झाली.

यंदाच्या निवडणुकीत स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था आणि रयत या दोन मोठ्या संस्था आघाडीत सहभागी झाल्याचा लाभ विकास आघाडीस झाला. ऐन निवडणुकीत उफाळून आलेल्या वादाचा फटका सुटाला बसला. विद्यापीठ विकास आघाडीने यापूर्वीच संस्थाचालक प्रतिनिधी गट आणि प्राचार्य गटावर बाजी मारली होती, तर आता त्यांनी नोंदणीकृत पदवीधर गटावरही आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

संपूर्ण रात्रभर विद्यापीठाचे अधिकारी आणि कर्मचारी मतमोजणी प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी काम करत होते. कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर आणि उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे यांनी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्याबरोबरच स्वतःही मतमोजणी आणि वर्गीकरणाचे काम करत होते. पहाटे ५ वाजल्यानंतर नोंदणीकृत पदवीधर संघाचा निकाल जाहीर झाला. यावेळी उमेदवारांसह त्यांच्या समर्थकांनी घोषणाबाजी करत जल्लोष केला, तर महाविद्यालयीन शिक्षक आणि विद्या परिषदेवर विजय मिळविल्यानंतर सुटाच्या सदस्यांनी जल्लोष करत एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

**नोंदणीकृत पदवीधर गटातील विजयी उमेदवार आणि कंसात त्यांना मिळालेली मते :** सर्व जागा विद्यापीठ विकास आघाडीकडे : संजय जाधव - (१२७४), स्वाती पंडित - (५२२५), दिनेश जंगम - (४८७९) अमरसिंह रजपूत - (५०६३) मधुकर पाटील - (११२४) पंकज मेहता - (९९३) मल्लाप्पा चौगुले - (१०६३) श्रीनिवास गायकवाड - (१००२) आरती शिंदे - (५१३८)

महाविद्यालयीन शिक्षक संघ विद्यापीठ विकास आघाडी : सतीश घाटगे - (५१५), वसंत पाटील - (४४५)

सुटा : अरुण पाटील - (५५६), आर. आर. थोरात - (१३६६), अलका निकम - (१७०७), मनोज गुजर - (४९४), ईला जोगी - (१६९७), एन. के. खंदारे - (१४६८), प्रकाश कुंभार - बिनविरोध.

विद्या परिषद शिक्षक सायन्स टेक्नॉलॉजी विद्या शाखा : डॉ. डी. एच. दगडे - (१९२७), पी. एन. वासंबेकर - (१८९२)

वाणिज्य विद्या शाखा आर. जी. कोरबू - (१८०४), आय. डी. एस. विद्या शाखा, प्रतिभा पाटणकर - (१८६६).


अमरसिंह रजपूत


दिनेश जंगम


अरुण पाटील


डी. एच. दगडे


आर. जी. कोरबू


एन. ए. खंदारे


आर. आर. थोरात


पी. एन.वासंबेकर



एम. डी. गुजर


मधुकर पाटील


मल्लाप्पा चौगुले


पंकज मेहता


प्रकाश कुंभार


संजय जाधव


सतीश घाटगे


श्रीनिवास गायकवाड


वसंत पाटील


स्वाती पंडित


आरती शिंदे


प्रतिभा पाटणकर


अलका निकम


ईला जोगी

### सर्वांच्या सहकार्यामुळे निवडणूक सुरळीत

निवडणूक प्रक्रियेबाबत बोलताना कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी व्ही. डी. नांदवडेकर म्हणाले, सुरुवातीपासूनच सर्वच घटकांनी निवडणूक सुरळीत पार पडावी यासाठी कष्ट घेतले होते. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया पारदर्शी आणि सुरळीतपणे पार पडली. पुढील निवडणुकांतही या अनुभवावरून निवडणूक सुरळीत पार पाडण्यात येतील.

### मोठ्या संख्येने मते बाद

अभ्यास मंडळाप्रमाणेच शिक्षक गटामध्ये १८६, तर नोंदणीकृत पदवीधर गटामध्ये ६६९ मते बाद झाली. काही मतदारांनी मतपत्रिकांतून आपल्या भावनाही मांडल्या होत्या. पदवीधर गटातील एका मतपत्रिकेवर 'विजयी उमेदवारांनी विद्यापीठाच्या विकासाकडे लक्ष देण्याचे आवाहन केले होते.

# 'पदवीधर'च्या दहा जागांवर विकास आघाडीचा झेंडा

## विद्यापीठ शिक्षक संघाची (सुटा) शिक्षक गटात बाजी : सिनेटच्या ३९ पैकी ३० जागा विकास आघाडीकडे

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीत शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीने पदवीधरच्या दहापैकी दहा जागांवर निर्विवादपणे आपले वर्चस्व सिद्ध केले. शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाने (सुटा) महाविद्यालयीन शिक्षक गटातील आठ जागांवर बाजी मारली असून, विद्या परिषदेच्या सहा जागांवर 'सुटा'चाच झेंडा फडकला. विकास आघाडीने महाविद्यालयीन शिक्षक गटातील दोन जागा मिळवून 'सुटा'चा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या या गटाला धक्का दिला. विकास आघाडीने सिनेटच्या ३९ पैकी ३० जागा मिळविल्या.

पंधरा अभ्यास मंडळांचे निकाल सोमवारी (ता. २०) सायंकाळपर्यंत जाहीर झाल्यानंतर मतदारांना उत्सुकता होती ती पदवीधर, महाविद्यालयीन शिक्षक, विद्या परिषदेच्या निकालाची. रात्री आठनंतर पदवीधर गटाची मतमोजणी सुरू झाली. विकास आघाडीच्या स्वाती पंडित, दिनेश जंगम, अमरसिंह रजपूत व आरती शिंदे यांच्या विजयाची घोषणा होताच समर्थकांनी आनंदोत्सव साजरा केला. रात्री बारापर्यंत हे निकाल जाहीर झाले. त्यानंतर विकास आघाडीचे संजय जाधव विजयी झाले. आघाडीचे अध्यक्ष संजय डी. पाटील रात्री दोनच्या सुमारास परीक्षा भवनच्या परिसरात आले.

विजयी उमेदवार

पदवीधर



मल्लाप्पा चौगुले, श्रीनिवास गायकवाड, संजय जाधव, पंकज मेहता, मधुकर पाटील, आरती शिंदे, दिनेश जंगम, स्वाती पंडित, अमरसिंह रजपूत

महाविद्यालयीन शिक्षक



अशोक पाटील, एन. के. खंदारे, अलका निकम, आर. आर. थोरात, इला जोगी, सतीश घाटगे, प्रकाश कुंभार, वसंत पाटील, एम. डी. गुजर, अरुण पाटील

विद्या परिषद



बी. एच. दगडे, पी. एम. वासंबेकर, पी. एस. पाटणकर, सुनील सावंत, आर. जी. कोरबू, शर्मिला साबळे

### विद्यापीठ कर्मचारी महिलेच्या कन्येचे यश

पदवीधर गटातून विकास आघाडीची उमेदवार आरती शिंदे विजयी झाली. तिला ५३०० मते मिळाली. ती एम.एस्सी. झाली असून, भारतीय युवा मोर्चाची महिला अध्यक्ष आहे. तिची आई विद्यापीठ कर्मचारी आहे.

### ८५५ मते बाद...

महाविद्यालयीन शिक्षक गटात १८६, तर पदवीधरमध्ये ६६९ मते बाद झाली. विशेष म्हणजे काही मतपत्रिकांवर विद्यापीठ विकासासाठी योगदान द्या, असा संदेशही मतदारांनी दिला होता.

### सुमारे चोवीस तास मतमोजणी...

काल (ता. २०) परीक्षा भवनमध्ये सकाळी नऊ वाजता मतमोजणीस सुरवात झाली. ही मतमोजणी आज (मंगळवार) सकाळी आठ वाजून पाच मिनिटांनी संपली. सुमारे चोवीस तास मतमोजणी प्रक्रिया सुरू होती.

### प्रा. ढमकले पराभूत...

'सुटा'तून बंडखोरी केलेल्या प्रा. आर. डी. ढमकले यांना ६५३ मते मिळाली. ते महाविद्यालयीन शिक्षक गटातून पराभूत झाले. मात्र त्यांनी मिळवलेली मते वैशिष्ट्यपूर्ण ठरली. प्रचारासाठी त्यांना केवळ चार दिवस मिळाले होते.

### शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी

- सिनेटच्या ३९ पैकी ३० जागा जिंकल्या
- पदवीधर १० पैकी १०
- संस्थाचालक ६ पैकी ६ (बिनविरोध)
- प्राचार्य ९ पैकी ९ (८ बिनविरोध)
- विद्यापीठ शिक्षक ३
- महाविद्यालयीन शिक्षक ३
- १७ अभ्यास मंडळांवर वर्चस्व

### नऊ फेऱ्यांनंतर घाटगे विजयी...

महाविद्यालयीन शिक्षक गटात शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीच्या सतीश घाटगे यांना विजयासाठी नऊ फेऱ्यांची प्रतीक्षा करावी लागली. नवव्या फेरीत ते विजयी झाले, तर याच आघाडीच्या संजय पांडुरंग जाधव यांनी पदवीधर गटातून पहिल्याच फेरीत बाजी मारली. या गटात सातव्या फेरीत श्रीनिवास गायकवाड विजयी झाले.



| पदवीधर (एकूण जागा १०) | | |
|---|---|---|
| उमेदवाराचे नाव | मते | गट |
| मल्लाप्पा लगमाण्णा चौगुले | १०६३ | विकास आघाडी |
| श्रीनिवास बाळासाहेब गायकवाड | १००९ | विकास आघाडी |
| संजय पांडुरंग जाधव | १२७४ | विकास आघाडी |
| पंकज पद्मचंद मेहता | ११६१ | विकास आघाडी |
| मधुकर मुकुंद पाटील | ११२४ | विकास आघाडी |
| आरती शिंदे | ५३०० | विकास आघाडी |
| दिनेश जंगम | ४८७९ | विकास आघाडी |
| स्वाती विनोद पंडित | ५५२५ | विकास आघाडी |
| अमरसिंह रजपूत | ५०६३ | विकास आघाडी |
| लोभाजी भिसे | बिनविरोध | विकास आघाडी |

| विद्या परिषद (एकूण जागा ८, रिक्त २) | | |
|---|---|---|
| बी. एच. दगडे | १९२७ | शिक्षक संघ (सुटा) |
| पी. एम. वासंबेकर | १८९२ | शिक्षक संघ (सुटा) |
| पी. एस. पाटणकर | १८६६ | शिक्षक संघ (सुटा) |
| सुनील सावंत | १७०५ | शिक्षक संघ (सुटा) |
| आर. जी. कोरबू | १८०४ | शिक्षक संघ (सुटा) |
| शर्मिला साबळे | (बिनविरोध) | शिक्षक संघ (सुटा) |

| महाविद्यालयीन शिक्षक (एकूण जागा १०) | | |
|---|---|---|
| मनोज दशरथ गुजर | ४९४ | शिक्षक संघ (सुटा) |
| अरुण ए. पाटील | ५५६ | शिक्षक संघ (सुटा) |
| अशोक पाटील | ५२२ | शिक्षक संघ (सुटा) |
| एन. के. खंदारे | १४६८ | शिक्षक संघ (सुटा) |
| अलका निकम | १००७ | शिक्षक संघ (सुटा) |
| डॉ. आर. आर. थोरात | १३६६ | शिक्षक संघ (सुटा) |
| डॉ. इला जोशी | १६९७ | शिक्षक संघ (सुटा) |
| सतीश रामचंद्र घाटगे | ५१५ | विकास आघाडी |
| वसंत मारुती पाटील | ४४५ | विकास आघाडी |
| प्रकाश कुंभार | बिनविरोध | शिक्षक संघ (सुटा) |

# भीती झुगारून द्या, भविष्य घडेल

» पान १ वरून

यांचे सहप्रायोजकत्व होते. वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये समीट झाले. विन समन्वयक सूरज चव्हाण यांनी संयोजन केले.

श्री. काकडे म्हणाले, "जे जे सभोवताली आहे ते माहितीचे जंगल आहे. माहितीला संस्कार देऊन तिचे रूपांतर ज्ञानात करू शकतो का?, कृतीतून ते स्वर्यात उतरू शकतो का?, याचा विचार तरुणाईने केला पाहिजे. अज्ञानातून ज्ञानाकडे वाटचाल करणे, हा यशाचा मार्ग आहे. एकत्र येणे ही यशाकडे जाण्याची सुरवात आहे. प्रसिद्धी, पैसा, सन्मान मिळविण्यासाठी संस्कारांची शिदोरी तुमच्यासोबत ठेवा. भौतिक सुखे मिळविण्यासाठीची पात्रता विनयाने येते. भारतीय संस्कृतीचे सार भगवद्गीता, उपनिषदांत आहे. त्याचा अर्थ जाणून घ्या, असे आवाहनही त्यांनी केले.

## आपणही भविष्य घडवू शकतो

» पान १ वरून

मी घडल्यानंतर समाजालाही घडविणार, ही प्रवृत्ती अंगी बाणवावी लागते. माणसाचे भविष्य त्याच्या वर्तमान काळावर ठरते. माणूसच स्वतःला बदलू शकतो. वाल्याचा वाल्मिकी बनू शकतो, तर मग आपणही हव्या त्या पद्धतीने घडू शकतो. कारण आपल्यात प्रचंड क्षमता आहेत. तुमचे आई-वडील तुमच्यात स्वप्नं बघत आहेत. लालेलाल डोळे झालेल्या लोहारच्या डोळ्यांतही मुलाने काय व्हावे, याचे स्वप्न असते. ते पूर्ण करण्यासाठी मुलाने धडपडले पाहिजे. आयुष्यात पैसा सगळे काही देऊ शकत नाही आणि पैशाशिवाय आपण काही करू शकत नाही, याचा अर्थ समजून घेऊन प्रवास करायला हवा. पैसा व आयुष्य या दोन्ही गोष्टी सुंदर करायच्या असतील काहीतरी वेगळे करून दाखविण्याची गरज आहे. आपले आयुष्य तर क्षमतांनी पुरेपूर भरलेले आहे. इच्छा कागदावर उतरवून लक्ष केंद्रित करा. तीन-चार वर्षे पूर्ण करिअरला द्या. प्रेमात जरूर पडा; पण त्यातून उभारायला शिका.

- आधुनिक कौशल्ये आत्मसात करा
- सॉफ्ट स्किल करिअरला आकार देणारी
- कम्युनिकेशन स्किल हस्तगत करा
- भीती झुगारून द्याल तरच जग घडेल.

# भरारी घेण्यासाठी गडकोट धुंडाळा

» पान १ वरून

लोळले आहात, तुमचे गुडघे फुटले आहेत का, किल्ल्याची परिक्रमा कधी केली आहेत का, पन्हाळा-पावनखिंड मोहीम चालत पूर्ण केली आहे का, विंचू चावलाय काय? याचा अनुभव घेतला असेल, तर जीवनात आपण खूप काही शिकल्यासारखे आहे. शिवचरित्र का अभ्यासायचे, याचे उत्तर शोधण्याचा तो एक राजमार्ग आहे.

लक्षात ठेवा की, बंद पुस्तकाच्या पलीकडेही आयुष्य आहे. आज आयटी क्षेत्रात सर्वात जास्त आत्महत्या होत आहेत. संघर्षातून माणूसपण हरविले आहे. हा संघर्ष संपवून भरारी घ्यायची असेल, तर गडकोट धुंडाळले पाहिजेत. कारण गडकोटांवर चरित्र घडते, तेच राष्ट्रीय चारित्र्य घडवते. भटकंतीचे क्षितिज मोठे आहे. तेथे कितीही ओरडलो तर कुणीही ऐकायला नसते. शिवचरित्र म्हणजे फक्त जयजयकारासाठी नव्हे, तर ते समजून घेण्यासाठी आहे. शिवचरित्रातील प्रत्येक प्रसंग मार्गदर्शन करणारा आहे. बुलंद आत्मविश्वास मिळवायचा असेल, तर गडकोटांवर भटकंती करा. गडकोटांची पुनर्बांधणी हा एक करिअरचा भाग आहे, हे लक्षात घ्या.

- किल्ले स्वच्छ ठेवणे हेच आपले कर्तव्य
- गडकोट हीच राष्ट्राची धारातीर्थे
- गडकोट गुपचूप भेटायची ठिकाणे नव्हेत
- शिवजयंतीच्या तारखेचा वाद राजकारण्यांच्या सोयीचा

# प्रत्येक स्पर्धा खूप शिकवणारी

» पान १ वरून

पैलवानकीचा आहार घ्यायचे. खूप सराव करायचे. कुस्ती व शाळेचा मेळ साधताना त्रास व्हायचा. कुस्ती नको वाटायची. यश मिळवत गेल्यानंतर आत्मविश्वास वाढत गेला. इंडियाचा कोट घालताना खूप आनंद झाला. स्पर्धेसाठी हरियाना, दिल्लीला जावे लागले. एकदा तर थोडे पैसे कमी पडल्याने विमानाची संधी हुकली. वडिलांच्या प्रोत्साहनाने नववीला असताना पहिल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेनिमित्त विमानात बसायची संधी मिळाली. पहाटे चार वाजता उठून सरावाला सुरुवात होते. आठवड्यातून दोन वेळा जिम करावी लागते. स्पर्धेबाबत सांगायचे, तर परदेशातील कुस्तीपटूंविरोधात टिकू शकू की नाही, याचा तणाव असतो. तो कमी करण्यासाठी मेडिटेशन, योगाचे प्रशिक्षण घेतले आहे. अपयश येते, म्हणून खचायचे नाही. सरावात सातत्य ठेवले तर खूप काही शक्य होते. पुण्याला एकदा स्पर्धा होती. पण तेथे जायला मिळाले नाही. तरीही हुशार मुलींसोबत माझा सत्कार झाला. त्यावेळीच ठरविले की, आपला खरा सत्कार झाला पाहिजे. आता २०२० ला ऑलिंपिकमध्ये पदक मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू राहणार आहेत.

- अथक सराव हेच यशाचे गमक
- जपानी मल्ल टेक्निकली फास्ट
- कुस्ती आपल्याच डोक्यानेच करावी
- स्वतःला कमी समजणाऱ्यांकडून आरोप होतात